## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मंगळवार दि. ५ जुलै २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४० वी बैठक मंगळवार दि.५ जुलै २०११ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा.श्री. हेमराज शाह | सदस्य |
| ३) | मा. श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ५) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ७) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ८) | मा.श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ९) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १०) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ११) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | श्री.तारीख फारुखी | सदस्य |
| १४) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | मा.डॉ.श्री.ल.पुलकुंडवार | अवर सचिव |
| १६) | श्री.ओ.बी.साहू | सहमुख्य अधिकारी |
| १७) | श्री.महिषी,निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १४० व्या बैठकीत सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्मा.सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगून मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १४०.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.३०.०५.२०११ रोजी झालेल्या १३९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

-------------

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र. १ ते ३९ वर सादर करण्यांत आले आहे.

बैठकीच्या सुरुवातीस मा.सन्मा सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मा.अध्यक्ष व सभागृहाच्या असे निदर्शनास आणले की, बैठकीची विषयसूची / अंजेडा हा तीन दिवसापूर्वी सर्व सदस्याने मिळणे आवश्यक आहे, परंतु बैठकीची विषयसूची दोन दिवस आधी म्हणजेच रविवारी पाठविण्यांत आलेला आह, ही खेदाची बाब आहे.

मा.मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मं. यांनी यापुढे बैठकीची विषयसूची सर्व सन्मा. सदस्यांना , बैठकीच्या तीन दिवस अगोदर देणेबाबत सचिव श्री.महिर्षी यांना सूचना केल्या.

सन्मा सदस्य श्री.बशीर पटेल व इतर सदस्यांनी एफएसआय २.५ बाबत काही शंका उपस्थित केल्या तसेच त्यांनी मा.अध्यक्ष यांना असे विचारले की, यापुढे सर्व २.५ वरुन ३.०० एफएसआर देण्याचे एनओसीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे बंधनकारक आहे का.

मा.मुख्य अधिकारी यांनी वरील मुद्दाबाबत असे स्पष्ट केले की, किमान चटईक्षेत्र निर्देशांक भूखंडाच्या २.५ वरुन ३.० करण्यांत आलेला आहे. सदर सुधारीत नियमावलीप्रमाणे रुपांतरांचे प्रत्येक प्रकरण शासनाकडे मंजूरीस्तव सादर करणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे, याबाबत मा.राज्यमंत्री ( गृहनिर्माण ) व मा.प्रधान सचिव यांचेशीही चर्चा झाली आहे, आतापर्यंत बोर्डातर्फे २.५ एफएसआयच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाना मंजूरी देवून एनओसी देण्यांत येत होत्या, यापुढे त्याच प्रमाणे ३.०० एफएसआयच्या प्रस्तावाना मंजूरी देवून एनओसी देण्याचे अधिकार बोर्डाला आहेत.मग २.५ ते ३.०० रुंपातर करण्यांचे अधिकारही मंडळाला देणेबाबत विचार होणेस हरकत नसावी. तथापि सुधारीत नियमावलीप्रमाणे नियमानुसार प्रकरणे शासनाकडे मंजूरीस्तव पाठविण्याची कार्यवाही करण्यांत येईल, असेही मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.बशिर पटेल यांनी एकाच भूखंडावर वेगवेगळया उपकर प्राप्त व बिगर उपकर प्राप्त इमारती असताना पूर्वी एका उपकर प्राप्त इमारतीस ना हरकत प्रमाणपत्र दिले असल्याचे व आता प्रस्ताव नाकारल्याबाबत विचारले .

मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी याबाबत स्पष्ट केले की, अशी प्रकरणे प्रकरण निहाय्य तपासून निर्णय घ्यावा लागतो, तथापि या बैठकीकरिता आलेल्या एका

प्रस्तावामध्ये तपासणी केली असता सदर प्रकरणी एका इमारतीस पुनर्विकासाची परवानगी दिल्यास अन्य इमारतींकरिता पुनर्विकास भूखंड शिल्लक रहात नाही/ त्या इमारतीच्या पुनर्विकास पुढे शक्य होणार नाही, असे दिसून आल्याने सदर प्रकरण परत करण्यांत आले आहे.

सन्मा.सदस्य श्री.हरिष सणस व इतर सदस्यांनी असा मुद्या उपस्थित केला की शासनाच्या सुधारित नियमावलीबद्दल आमच्या काही शंका आहेत, जसे की एखादया इमारतीस आपण यापूर्वी एनओसी दिलेली नसेल परंतु सदर इमारतीच्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त असेल तर त्याइमारतीस नवीन धोरणाप्रमाणे वाढलेल्या ३.० एफएसआय देण्यात येईल का ?

यावर मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी असे स्पष्ट केले की, ज्या प्रकरणामध्ये एनओसी देण्यांत आलेली आहे, त्याप्रकरणाबाबत मंडळास फेर विचार करता येणार नाही, परंतु ज्याप्रकरणाना एनओसी देण्यांत आलेली नाही व नियमाप्रमाणे अशा प्रकरणी वाढीव एफएसआय ३.०० देणे आवश्यक असेल तर त्या प्रकरणाबाबत फेर विचार करुन निर्णय घेणे मंडळास शक्य आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी ज्या ३३ प्रकरणांवर म्हाडा देय क्षेत्र खुल्या बाजारात विकलेले आहे. त्याप्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी पोलिस स्टेशनमध्ये जावून एफ.आय.आर. नोंदविणे आवश्यक आहेत. याबाबत मागील बैठकीत ठरले होते, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली.

यावर मा.मुख्य अधिकारी, दु.व पु. मंडळ यांनी असे स्पष्ट केले की, फ/ उत्तर विभागातील एका पोलिस स्टेशनमध्ये कार्यकारी अभियंता श्री.शेट्टी ,फ-उत्तर विभाग यांनी एफ.आर.आर नोंदविला आहे. त्याची प्रत सर्व संबंधित कार्यकारी अभियंताना देण्यांत आलेली असून त्याअनुषंगाने सर्व विभागातील पोलिस स्टेशनमध्ये जाऊन त्याप्रमाणे एफआयआर नोंदविणेबाबत सूचना त्यांना देण्यांत आल्या आहेत. एफआयआर नोंदविणेबाबतची कार्यवाही मंडळातर्फे सुरु झालेली आहे, तसेच मा. पोलिस आयुक्त/मुंबई यांना आर्थिक गुन्हे विभागामार्फत ही सर्व प्रकरणे एक सारखीच असल्याने सर्व प्रकरणे एकत्रित करुन गुन्हा दाखल करुन घेण्याबाबत मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेस्तरावरुन विनंती करण्यांत आली आहे.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर. सुधारणेबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची चौकशी केली.

श्री.महिषी, सचिव यानीं सदर प्रकरणी मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांचेस्तरावर डी.एस.आर.सुधारित करणेबाबत बैठक घेण्यात आली असून, मा.मुख्य अभियंता-१/प्रा. यांनी दिलेल्या सुचनेनुसार काही सुधारणा करण्यांत येत असून याबाबतची कार्यवाही

उपमुख्य अभियंता- परिमंडळ- १,२,३ व ४ / मुं.इ.दु.व पु.मंडळ यांचेस्तरावर होत असल्याचे स्पष्ट केले. तद्नंतर पुढील कार्यवाही मा.मुख्य अभियंता-१ / प्राधिकरण यांचेकडून होईल.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा करुन सुधारीत व्हेकेशन नोटीसचा मसूदा विधी सल्लागार/प्राधिकरण यांचेकडून मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मंजूरीसाठी प्राप्त झाला असून, त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यांत आलेली असल्यास ती सभागृहाच्या निदर्शनास आणावी .

यावर मा.मुख्य अधिकारी, दु.व पु. मंडळ यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या असे निदर्शनास आणले की, व्हॅकेशन नोटीसचा नवीन नमुना मंजूरीस्तव उपमुख्य अभियंता श्री.शेठ यांनी तयार केलेला आहे. तो आपण सर्वांनी पाहून घ्यावा व त्यामध्ये आपल्या काही सुधारणा/ सूचना असतील तर सुचवावा तद्नंतर त्यांनी श्री.शेठ, उपमुख्य अभियंता, परिमंडळ- २ यांना व्हॅकेशन नोटीसचा मसूदा व त्याबाबतची माहिती सर्वांना देणेबाबत सूचना केली.

श्री.शेठ उपमुख्य अभियंता, परिमंडळ - २ यांनी व्हॅकेशन नोटीसचा नवीन नमुन्याबद्दल सर्व सन्मा.सदस्य व उपस्थित अधिका-यांना सविस्तर माहिती दिली त्यामध्ये नवीन कोण-कोणत्या गोष्टीचा समावेश केलेला आहे याबाबतही माहिती दिली.

सर्वांनी सदर नवीन व्हॅकेशन नोटीसच्या नमुन्याबद्दल कौतुक केले व सर्वानी सदर नमुन्यास प्रसंती देवून हाच नमुन्या यापुढे वापरण्यांत यावे, जेणेकरुन यामध्ये कोणत्याही गैरप्रकार होणार नाही, अशी खात्री वाटते. असे मत दिले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी श्री.शेठ,उपमुख्य अभियंता व संबंधित अधिका-यांचे याबाबत अभिनंदन केले व व्हॅकेशन नोटीसचा नमुना फारच चांगल्याप्रकारे बनविल्याचे सांगितले, पुढे त्यांनी असे सुचविले की, अशा प्रकारे आपल्या वितरण पत्रातही ब-याच त्रुटी आहेत. त्यामध्येही बदल होणे गरजेचे आहे. त्यामुळे व्हॅकेशन नोटीसप्रमाणे वितरण पत्राचाही नमुन्यामध्ये फेरबदल करुन नवीन नमुना तयार करण्यात यावा.

मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, यावर विचार करुन पुढील कार्यवाहीस थोडा अवधी लागण्याची शक्यता आहे, जसे कि व्हॅकेशन नोटीस नमुना बनविण्यासाठी काही कालावधी लागला. सहमुख्य अधिकारी व उपमुख्य अधिकारी / पुगा यांना वितरण पत्राचा नवीन नमुना बनविणेबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी निर्देश दिले. त्यांनी श्री.शेठ, उपमुख्य अभियंता, परिमंडळ- २ यांची मदत घ्यावी, असेही सुचविले.

मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना व प्रस्तावास मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर तो प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीस्तव ठेवणे आवश्यक असल्याने प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर नवीन व्हॅकेशन नोटीसचा नमुना वापरण्यात येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बॅकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद कसा मिळतो याची विचारणा करुन जर तीन महिन्याचे भाडे एकदम भरल्यास त्यामध्ये भाडेकरुंना जी ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला आहे. त्याचा योग्य तो पाठपुरावा करावा व सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झालेली आहे का ? असे विचारले.

यावर श्री.तपासे, मुख्य लेखाधिकारी यांनी असे सांगितले की सदर प्रस्ताव अजून प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यांत आलेला नाही. प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवणेबाबत पाठपुरावा मंडळातर्फे करण्यांत येईल.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी संक्रमण शिबिरात वर्षानुवर्ष रहात असलेल्या भाड़ेकरुंना बृहतसूचीवर घेण्याकरिता जी नियमावली बनविलेली आहे, त्याप्रमाणे पात्र व बृहतसूचीवर येण्यास इच्छुक असलेल्या रहिवाशांना रितसर बृहतसूचीवर घेण्याची प्रक्रिया जून महिन्यापासून सुरु करण्याबाबत मागील बैठकीत सूचना देण्यांत आल्या होत्या. तसेच हस्तांतर झालेल्या सदनिकेच्याबाबत, सध्या राहणारा भाडेकरुंच्या नावांने मास्टर लिस्टचे गाळे वितरीत करणेबाबत कार्यवाही सुरु करण्यांत आलेली आहे का ? असे किती भाडेकरु आहेत, त्यांची स्वतंत्र यादी तयार करण्यांत आलेली आहे का, याबाबत विचारणा केली.

सन्मा.सदस्य श्री.शिरीषकर यांनी मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे पुनर्रचित इमारतीतील १८०/२२५ चौ.फूटाच्या गाळयांची यादी तसेच १३१ गाळयांच्या यादीमधील जे १७ गाळे वर्ग केले आहेत. त्यांच्या नस्त्या अजूनही मिळाल्या नसल्याबाबत तसेच श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी ( पु.गा.) यांनी मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे व मा.मुख्य अधिकारी/दु.व पु. यांनी सूचना केल्याप्रमाणे कोणतीच कार्यवाही केलेली नाहीत. तसेच त्यांनी असेही सांगितले की १३१ गाळयांची जी यादी बैठकीत देण्यांत आलेली आहे ती बरोबर नाही . याचा अर्थ सर्व सन्मा.सदस्यांची मंडळाने दिशाभूल केलेली आहे.हा मुद्दा पुन्हा उपस्थित करण्यांत येवून त्यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली.

सन्मा.सदस्य श्री.शिरीषकर यांनी मंडळाच्या असे निदर्शनास आणून दिले की. श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पुगा यांनी २७ पैकी काही नस्त्या उपलब्ध करुन दिल्या परंतु त्यामधील महत्वाची कागदपत्रे गायब करण्यांत आलेली आढळतात. सदर गाळे वितरण केलेल्या नस्त्या कार्यालयातून हरविलेल्या आहेत असे त्यांनी सांगितले. २०७६

तसेच मी श्री.मठपती यांचेवर १२ व १५ अशा एकूण २७ फाईल कार्यालयातून गायब करण्यांत आल्याचा आरोप करत आहे. तसेच सदरच्या फाईल बद्दल माहिती माझेकडे उपलब्ध आहे, परंतु ती मला कार्यालयातून उपलब्ध होणे गरजेचे आहे. मी सदर फाईलबाबत उपमुख्य अधिकारी/पुगा यांना विचारले असता ते मला सांगतात की याबाबत तुम्ही FIR नोंद करा. मला तर असे वाटते की, त्यांचेवर FIR नोंदविणे गरजेचे आहे व मी

त्यांचेवर असा आरोप करीत आहे की, श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पुगा हे दोषी असून त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे, तसे माझे असेही मत आहे की, श्री.मठपती उपमुख्य अधिकारी यांना वाचवण्याचा कार्यालयातर्फे प्रयत्न होत आहे.

वरील मुद्दयास सर्व सन्मा.सदस्यानी मान्यता दर्शविली व उपमुख्य अधिकारी/पुगा यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी अशी मा.अध्यक्ष महोदयाना विनंती केली.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत सहमुख्य अधिकारी श्री.साहू हे सखोल चौकशी करुन याबाबत अहवाल सादर करतील व त्यामध्ये जर सदर अधिका-यावर कार्यवाही करणे गरजेचे असल्यास त्यांची चौकशी करण्यांत येईल व प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल. तसेच त्यांनी असेही स्पष्ट केले की, कार्यालयातर्फे कोणत्याही कर्मचारी /अधिका-यांना वाचविण्याचा अथवा पाठीशी घालण्याचा प्रयत्न होऊ दिला जाणार नाही/ केला जाणार नाही. सर्व बाबतीत रितसर कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरणी खेरवाडी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली असून पोलिस स्टेशनकडून पुढील कार्यवाही करण्यांत येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

यासर्व कार्यवाहीत जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील त्यांचेवर कार्यालयातर्फे नियमानुसार कार्यवाही नक्कीच करण्यांत येईल, त्यामध्ये कोणासही वाचवण्याचा प्रयत्न होणार नाही, अशी खात्री मा.मुख्य अधिकारी/दु.व पु.मंडळ यांनी सभागृहातील सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांना दिली. तसेच त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, मागील १५ वर्षाच्या कालावधीत बृहतसूचीवरुन जे वितरण झालेले आहे, त्यासर्व गाळयाची/वितरण्याची तपासणी सर्व कार्यकारी अभियंता यांचेमार्फत सुरु करण्यांच्या सूचना देण्यांत आला असून, त्यांचेकडून ती कार्यवाही सुरु झाली आहे. तसेच सर्व कार्यकारी अभियंता यांना ज्या ४० गाळयाच्या वितरणाची माहिती उपमुख्य अधिकारी/पुगा कार्यालयात उपलब्ध नाही त्याची यादी देवून, या प्रकरणाबाबत तपासणी करुन प्रकरण रिकास्ट करण्यांत येईल, त्यामुळे प्रत्येक गाळयामध्ये कोण राहतो, राहणारी व्यक्ती रितसर रहात आहे की, अनधिकृतपणे रहात आहे, तसेच त्याला झालेले वितरण रितसर झालेले आहे का याबाबत छाननी करण्यांत येईल, त्यामध्ये गाळामध्ये रहात असलेल्या व्यक्तीकडून वितरणाबाबतच्या सर्व कागदपत्राच्या प्रती घेण्यांत येवून नस्ती तयार करण्यांत येतील, जेथे गाळे रिक्त असतील ते गाळे मंडळाच्या ताब्यात घेवून त्यांना सिल लावले जाईल. सदर उपलब्ध कागदपत्रावरुन कार्यालयाच्या हे निदर्शनास येवू शकेल की, सदर वितरण रितसर झालेले आहे किंवा बोगस व त्यानुसार पुढील कार्यवाही करणे सोईस्कर होईल व त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. २१०६.

मा.मुख्य अधिकारी/दु.व पु. मंडळ यांनी असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, मास्टर लिस्टमधील गाळे वितरणाचे अधिकार हे उपमुख्य अधिकारी/पुगा यांना आहेत, परंतु

सर्व सन्मा. सदस्यांच्या भावनाचा विचार करुन त्याअनुषंगाने त्यांची बदली रद्द करणेबाबतचा प्रस्ताव मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यांत यावा, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.शिरीषकर यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की २७ फाईलबाबत ज्यावेळी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पुगा यांना विचारले असता त्यांनी सदर नस्त्या वॉर्डमध्ये गेल्याचे सांगितले ते पूर्णतः खोटे सांगितले, कारण सदर नस्त्या पुर्नरचित गाळे विभागाकडून (RT) संबंधित विभागाकडे पाठविलेल्या नाही.

मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व सन्मा सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले की, बृहतसूचीवरुन वितरणाच्या अनुषंगाने दै.नवशक्ती,फ्रि.प्रेस वर्तमान पत्रात जाहिरात दि.५/०७/२०११ रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. तसेच त्यांनी असेही स्पष्ट केले की, मंडळातर्फे ज्या इमारती पुनर्रचित करण्यांत आलेल्या आहेत त्यामध्ये किती मूळ गाळेधारक होते व त्यामध्ये किती ज्यादा गाळे होते याबाबत तसेच वि.नि.नि. ३३ (७) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्राच्या माध्यमातून प्राप्त गाळयांची मंडळातर्फे तपासणी सुरु करण्यांत आलेली आहे. या सर्व प्रक्रियेस थोडा कालावधी लागणार आहे परंतु यानंतर मंडळास सर्व गाळयाबाबत सविस्तर माहिती उपलब्ध होवू शकेल. म्हणजे मंडळाकडे किती गाळे उपलब्ध होते, किती गाळे वितरण झाले, उपलब्ध झालेल्या अतिरिक्त गाळयामधून रितसर वितरण झालेले आहे का, तसेच एनओसी अंतर्गत प्राप्त होणा-या गाळयांचे वितरण मागील १५ वर्षात कशा प्रकारे झाले याबाबतची सर्व सविस्तर माहिती प्राप्त होवू शकेल व त्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल. परंतु यासर्व प्रक्रियेस दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागणाची शक्यता आहे.

सन्मा.सदस्य श्री.शिरीषकर यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, मंडळाचे जे वेडे-वाकडे, त्रिकोणी व आकाराने लहाने असलेल्या १३१ गाळयाची यादी देण्यांत येणार होती त्याचे पुढे काय झाले. तसेच मुंबई मंडळाकडे किती गाळे वर्ग करण्यांत आलेले आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी/दु.व पु.मंडळ यांनी उपमुख्य अधिकारी/पुगा यांचेकडून माहिती घेवून सांगितले की, यामधील ९७ गाळे जाहिरातीत समाविष्ट करण्यांत आलेले आहेत. उर्वरित गाळयाची यादी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पुगा यांना सर्व सदस्यांना देणेबाबत निर्देश दिले. मुंबई मंडळाकडे सध्या कोणतेही गाळे वर्ग केलेले नाहीत, परंतु जर जाहिरातीत दिलेल्या ९७ गाळयांचे वितरण झाले नाही तर सदर गाळे मुंबई मंडळाकडे विक्रीसाठी वर्ग करण्याची कार्यवाही करण्यांत येईल. तसेच सदर माहिती म्हाडाच्या संकेत स्थळावरही प्रसिध्द करण्यांत आल्याचेही त्यांनी सर्वांना सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव व सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, त्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयाना वैयक्तिक पत्र दिले असून त्यानी एक प्रत श्री.महिषी यांना दिल्याचेही निदर्शनास आणून दिले. मागील बैठकीमध्ये एक अभ्यास गट संघटित करण्यांत आलेला होता त्यामध्ये मंडळाचे सन्मा.सदस्य तसेच श्री.अर्गेकर,उपमुख्य अभियंता हे निमंत्रक होते, या अभ्यास गटाने एक अहवाल तयार केला होता तो मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यासाठी देण्यांत आलेला होता, परंतु सदर अहवालाबाबत काय झाले सदर अहवाल आजपर्यंत मंडळाच्या बैठकीत का ठेवण्यांत आलेला नाही.

मा.मुख्य अधिकारी यांनी अभ्यास गटाने सादर केलेला अहवाल मंडळाच्या बैठकीत ठेवणेबाबत श्री. महिषी यांना विचारले असता, त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, त्यामध्ये काही त्रुटी आहेत व त्याबाबत मुख्य अभियंता यांचे मत घेवून तद्नंतर सदर प्रस्ताव लवकरच मंडळाच्या बैठकीत ठेवण्यांत येईल नंतर शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यांत येईल.ही बाब महत्वाची असल्यामुळे त्यासाठी एक ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले, तसेच त्यांनी असेही सांगितले की, याबाबत आतापर्यंत जी काही कार्यवाही झालेली आहे ती, सभागृहाच्या समोर आली पाहिजे याकरिता पुढील बैठकीत अभ्यास गटाने तयार केलेल्या अहवालीची प्रत सर्व उपमुख्य अभियंता,कार्यकारी अभियंता यांना देण्यांत येवून त्यामध्ये काही त्यांच्या सुधारणा आहेत का तसेच पुढील बैठकीत मुख्य अभियंता यांना बैठकीत येणेबाबत विनंती करण्यांत यावी, जेणेकरुन अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री बांदिवडेकर यांनी मुद्दा उपस्थित केला की, दुरुस्तीच्या कामांसाठी मंडळातर्फे जे कंत्राटदार नेमलेले असतात त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांनी एका चौकटीत काम करणेबाबत तसेच त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेअंतर्गत काम करणे गरजेचे असल्यामुळे याबाबत मागील बैठकीत मा.मुख्य अधिकारी यांनी एक नियमावली तयार करणेबाबत आश्वासन दिले होते परंतु सदर नियमावाली सादर केलेली दिसून येत नाही. तसेच सदर ठेकेदार जर व्यवस्थीत काम करीत नसेल तर त्याला ब्लॅक लिस्टमध्ये किंवा त्याचे लायसन्स रद्द करण्याबाबत काही नियम आहेत का असे विचारले.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर कंत्राटदारांकरुन काम करुन घेणेबाबत आपल्या मंडळातील अधिकारी म्हणजे कार्यकारी अभियंता/ उपमुख्य अभियंता हे सक्षम आहेत, त्यांनी या कंत्राटदारांवर देखरेख ठेवून ते करारनाम्याप्रमाणे ( कॉन्ट्रक्ट ॲग्रीमेंट ) काम करीत आहे का हे पहाणे अपेक्षित आहे योग्य प्रकारे काम होत नसेल तर त्यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु त्यांची नोंदणी रद्द करणे

किंवा त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकणे याबाबतची कार्यवाही मुख्य अभियंता/प्रा. किंवा कामांची मंजूरी देणारे संबंधित उपमुख्य अभियंता /मुख्य अभियंता हे याबाबत कार्यवाही करु शकतील, तरी यापुढे सर्व कंत्राटदारावर लक्ष ठेवून त्यांचेकडून रितसर काम करुन घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची असून त्यानी अशा प्रकारे तक्रारी येणार नाही. याची खबरदारी घ्यावी. असे सांगितले. तसेच जर सदर कंत्राटदार काम नीट करत नसेल तर त्यांची नोंदणी रद्द करणेबाबत उपमुख्य अभियंता, परिमंडळ -२ यांनी कार्यवाही करावी व त्याचे देयक अदा करण्यांत येवू नये.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की,पीएमजीपी प्रकल्पातर्फे ज्या इमारती बांधण्यात आलेल्या आहेत त्या १९८८-८९ पूर्वीच्या असून सध्या त्यांची अंत्यत वाईट स्थिती आहे, त्या कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकत्याच एका इमारतीतील एका खोलीत स्लॅाब कोसळून अपघात झालेला आहे, ही बातमी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेली आहे. तसेच उमरखाडी येथील इमारतीत वारंवार अपघात घडत असतात, मागील कालावधीत मंडळातर्फे १५ कोटी देखभाल खर्चासाठी देण्यांत आले होते ते त्यातील थोडी-थोडी रक्कम प्रत्येक इमारतीसाठी वाटून देण्यांत आली, परंतु यामुळे सदर प्रश्न सुटला नाही कारण सदर इमारतीची देखभाल होत नसल्यामुळे, बांधकाम निष्कृष्ट दर्जाचे असल्यामुळे सदर इमारतींचा पुनर्विकास मंडळातर्फे करणेबाबत सर्व सन्मा.सदस्यांतर्फे विनंती करण्यांत आली.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, पीएमजीपी अंतर्गत ज्या इमारती बांधण्यात आलेल्या आहेत, त्या देखभाली अभावी आता खूपच खराब झालेल्या आहेत, तसेच त्याइमारतीत गाळे हे १६५ते १८० चौ.फूट अशा कमी आकारमानाच्या आहेत, त्यासर्व ६६ इमारती खराब अवस्थेत असून व काही दुरुस्तीच्या पलिकडे असल्यामुळे, विविध ठिकाणी वारंवार अपघात घडत असतात, त्यामुळे याबाबत शासनाकडे सदर इमारतीचा पुनर्विकासाचा प्रस्ताव पाठविला होता, परंतु तो अद्याप मंजूर झालेला नाही. उमरखाडी येथील ९ इमारतीने व्यापलेला एरिया जवळ जवळ ७००० चौ.मिटर असून मोठा भूखंड उपलब्ध होण्याची शक्यता आहे व त्यामुळे तेथे विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) खाली पुनर्विकासाची योजना राबविणे शक्य आहे. परंतु यासर्व बाबीस थोडा अवधी लागेल, कारण सदर बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने शासनाची मंजूर घेणे आवश्यक आहे, मंजूरी प्राप्त झाल्यास आपण सदर इमारतीचा पुनर्विकास वि.नि.नि. ३३ (९) खाली करु शकू. याबाबत मा.सचिव/गृहनिर्माण यांचेशी मी चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत मंडळातर्फे कार्यवाही सुरु आहे.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्मानिय सदस्यांचा असे निदर्शनास आणून दिले की, मी मागील सहा महिन्यात मंडळाच्या विविध अधिका-यांना पत्रे

लिहिलेली आहे, परंतु मला येथे असे खेदाने नमूद करावेसे वाटते की, माझा एकाही पत्राचे उत्तर मला आजतागायत देण्यांत आलेले नाही. जर मंडळाच्या एका सदस्यास मंडळाच्या अधिका-यांकडून अशी वागणूक मिळत असेल, तर सर्वसामान्य जनतेशी आपल्या विभागातील अधिकारी कसे वागत असतील. त्यांनी श्री.महिषी, निवासी कार्यकारी अभियंता यांना दि.१० मार्च २०११ यांना एक पत्र दिले होते त्यामध्ये मंडळातंर्गत विविध विषयाची माहिती विचारली होती, जसे की, सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी उपस्थित केलेला मुद्दाशी मी सहमत असल्याचे सांगितले व त्यांनी जी माहिती मागितलेली आहे,तीच माहिती मी माझा पत्राव्दारे मागितलेली आहे. तसेच त्यांनी आणखी एक मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला की, माणिकलाल चाळ, कथारिया मार्ग,माहिम याइमारतीचा पुनर्विकासाच्या प्रस्तावात मंडळास काही बोगस कागदपत्र सादर करण्यांत आलेले आहे, त्याबाबत त्यांनी पुराव्यासह काही कागदपत्रेही बैठकीत उपस्थिताना दाखविली, तरी याबाबत सखोल चौकशी व्हावी, अशी त्यांना मा.अध्यक्ष महोदयानां विनंती केली.

यानंतर सर्व सन्मानिय सदस्यांनी मा.मुख्य अधिकारी/दु.व पु. मंडळ यांचे असे निदर्शनास आणून दिले की, कोणत्याही सन्मा.सदस्यांनी मंडळातील कोणत्याही विभागात व कोणत्याही अधिका-यास पत्र दिले तर त्याचे उत्तर आम्हाला दिले जात नाही, ही बाब गंभीर आहे, कारण नियमानुसार कोणत्याही सन्मा.सदस्यांनी पत्र दिल्यास त्या पत्राचे उत्तर आठ दिवसांचे आत देणे बंधनकारक आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु. मंडळ यांनी वरील बाब गंभीर स्वरुपाची असून त्यांनी सर्व उपस्थित अधिका-यांना निर्देश दिले की, यापुढे कोणत्याही सन्मा.सदस्यांकडून आपणांस पत्र प्राप्त झाल्यास त्याचे उत्तर आपणाकडून त्वरेन देणे बंधनकारक राहिल, तसेच सदर पत्रातील काही मुद्दे आपल्याशी निगडीत नसतील तर त्यांना उत्तर देणा-या पत्रात तसे नमूद करावे की, सदर विषय या कार्यालयाशी निगडीत नसून अन्य विभागाशी संबंधित असल्याचे नमूद करुन पत्राव्दारे मागितलेल्या माहितीसह देण्यांत यावे. तसेच सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी उपस्थित केलेल्या वरील मुद्दाबाबत त्यांनी श्री.महिषी यांना सदर नस्ती तपासून विकासकाने सादर केलेल्या कागदपत्राची पडताळणी करुन नस्ती सादर करणेबाबत निर्देश दिले. तसे पुढे असेही आश्वासन दिले की, सदर विकासकाने अशा प्रकारे बनावट कागदपत्र सादर केल्याचे आढळल्यास त्याचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल. त्यांनी मागितलेली माहिती ही श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पुगा , निवासी कार्यकारी अधिकारी व सहमुख्य अधिकारी यांचे अखत्यारित असल्यामुळे सदर माहिती त्यांना देणेबाबत त्यांनी संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या.

२७०६

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणले की, नेकजात मराठा या इमारतीत गाळा क्र.१ व २ हे गाळे श्री.केतन मुंकूद कपाडीया या व्यक्तिस बोगस वितरण करण्यांत आले आहे. तरी याबाबत खुलासा व्हावा.

यावर मा.मुख्य अधिकारी / दु.व पु. मंडळ यांनी सहमुख्य अधिकारी यांना वरील प्रकरणी सखोल चौकशी करुन सदर इमारतीतील गाळे तपासणी करुन अहवाल नस्तीसह सादर करणेबाबत सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.बांदिवडेकर यांनी एक मुद्दा उपस्थित केला की, एका इमारतीतील भाडेकरुने त्याचा राहता खोलीमध्ये मूळ स्थितीत म्हणजे जी इमारत म्हाडाने बांधल्यानंतर ज्याठिकाणी दरवाजा होता तो बंद करुन त्यांनी दुसरीकडे दरवाजा काढला याबाबत आम्ही रितसर म्हाडाकडे तक्रार केली नंतर महानगर पालिकेस तक्रार केली, आता कार्यवाही करणेसाठी महानगर पालिकेचे अधिकारी तेथे आले असता मुद्दा असा उपस्थित झाला की, सदर दरवाजा बंद करण्याचे व सिल करण्याचे अधिकार महानगर पालिकेस नाही तर मग ही कार्यवाही कशा प्रकारे पूर्ण होईल, याबाबत मा.अध्यक्ष यांनी कृपया खुलासा करणेबाबत विनंती केली.

यावर मा.मुख्य अधिकारी / दु.व पु. मंडळ यांनी सांगितले की, संबंधित कार्यवाही करतेवेळी मंडळाच्या अधिका-यांनी तेथे हजर राहून महानगर पालिकेच्या अधिका-यांना सहकार्य करावे व कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी.

**वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.**

**बाब क्रमांक - १४०-२ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागातील **प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता** देण्याबाबत

१.परिमंडळ-२ मधील (**डी-१, डी-२, डी-३ व ग-दक्षिण**) १८ इमारती.

*********

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **४१ ते ५१** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक - १४०/ १२३३</u>**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १८ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. ३,४३,१२,८१२/-(रुपये- तीन कोटी त्रेचाळीत लक्ष बारा हजार आठशे बारा फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्याची रक्कम रु.१,७४,७३,१२६/- (रुपये एक कोटी चौ-यात्तर लक्ष त्र्यात्तर

२८०६

हजार एकशे सव्वीस सोळा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १४० -२ (२)**

विषय - २. परिमंडळ-१ मधील (अ, सी-१, सी-२ व सी-३) १५ इमारती.

---------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **५३ ते ६३** वर सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४०/१२३४**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,६८,३५,५७६ /-(रुपये- एक कोटी अडसष्ट लक्ष पस्तीस हजार पाचशे शहात्तर फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,५४,२२,३६४ /- (रुपये एक कोटी चोपन्न लक्ष बाविस हजार तिनशे चवसष्ट फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक - १४०. २ (३)**

विषय - परिमंडळ-३ मधील (ब, ई-१ व ई-२) ३९ इमारती.

----------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६५ ते ८१ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४० /१२३५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण -३९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.८,१७,५३,३१८ /-(रुपये- आठ कोटी सतरा लक्ष त्रेप्पण हजार तिनशे अठरा फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ४,९५,२१,४३१ /- (रुपये चार कोटी पंच्याण्णव लक्ष एकविस हजार चारशे एकतीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

२७६

----------o-----o-----------

**बाब क्र.१४०.(२)४**

विषय - ४. परिमंडळ-४ मधील (**ग-उत्तर, फ-उत्तर, फ-दक्षिण**) १३ इमारती.

---------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.८३ ते९३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४० /१२३६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण -१३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. ३,२०,५९,५२८ /-(रुपये-तीन कोटी वीस लक्ष एकूणसाठ हजार पाचशे अठ्ठाविस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. २,३८,६०,८६६/- (रुपये दोन कोटी अडतीस लक्ष साठ हजार आठशे सहासष्ट फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

------------

बाब क्रमांक - १४० (३)

विषय - इ.क्र.४२-९, मोहमदी मेन्शन २२, डॉ.बाटलीवाला रोड, परेल, मुंबई
या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह.

-----------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.९५ वर सादर करण्यात आला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१४०/ १२३७**

सविस्तर चर्चेअंती इ.क्र.४२-९, मोहमदी मेन्शन २२, डॉ.बाटलीवाला रोड, परेल, मुंबइ या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास दि. २६/४/२०११ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता रु.३०,८५,७५६ या रकमेस प्रति_चौ.मी. रु.१७९०.८९/- या दराने काम मंडळामार्फत्त करण्यासाठी देण्यात आली होती. परंतु भाडेकरु/रहिवाशांनी सदर काम ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता प्रस्ताव दिल्यामुळे सदर काम मंडळामार्फत्त न करता ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------0--------0------------

बाब क्रमांक - १४० (४)

विषय - इमारत क्र.१०-१२ एम.ए.रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी निविदा मंजूर करण्याबाबत

-------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.९७ वर सादर करण्यात आला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक - १४० /१२३८</u>

इमारत क्रमांक १०-१२ एम.ए. रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीकरिता प्राप्त झालेली मे.सोलंकी ग्रुप यांची निम्मत्तम निविदा मूळतः २०% अधिक दराची व ठेकेदाराने स्वतःहून निम्मतम दर पत्र देवून १४.९९ टक्के अधिक असा सुधारित दिलेला दर तद्नंतर मा.मुख्य अभियंता -१/प्रा. यांनी वाटाघाटी करुन कमी केलेली १२ % अधिक दराची निविदा स्विकृत करण्यास सवानुमते मंजूरी देण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

बाब क्रमांक- १४० (५)

विषय - जुन्या उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती/ पुनर्रचने कामी भाडेकरु/रहिवाशांना देण्यांत येणा-या निष्कासन सूचनेच्या ( व्हॅकेशन नोटीस ) प्रारुप सुधारीत करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.९९ ते १०७ वर सादर करण्यात आला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक - १४०/ १२३९</u>

सदर प्रस्तावावर चर्चा होवून सादर केलेल्या निष्कासन सूचनेच्या ( व्हॅकेशन नोटीस ) सुधारीत प्रारुपास मंजूरी देण्यात येवून,प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठविण्याकरिता मान्यता देण्यांत आली.

बाब क्रमांक - १४०-६

विषय - **<u>शुध्दीपत्रक</u>**
इमारत क्र. ३४-३८ जे.डी.लेन या इमारतीच्या तिसऱ्या टप्प्यातील दुरुस्ती करीता सुधारीत कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेतील बदलाबाबत.

-------------------

१०६

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.१०९ वर सादर करण्यात आला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक - १४०/ १२४०</u>**

सविस्तर चर्चेअंती इ.क्र.३४-३८ जे.डी.लेन मुंबई या इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मंडळाच्या १३९ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता रु.७,२७,७६९/- या रकमेस देण्यांत आली होती परंतु ठराव क्र.१३९/१२२४ मध्ये प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु. ७,२६,६६९/- अशी दर्शविण्यांत आली होती. सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.७,२६,६६९/- ऐवजी रु.७,२७,६६९/- अशी वाचण्यास व रक्कम रु. ७,२७,६६९/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

**<u>बाब क्रमांक - १४० -७ पुनर्विकास</u>**

विषय - मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या
पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

------------------------------------

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासा करीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे २० प्रस्ताव पृष्ठ क्र. १११ ते १९९ वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

१. भुकर पहाणी क्र.३०३३ व ३०३४, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१०० व १०२ भंडारी स्ट्रिट, मुंबई येथील **"गोदावरी भवन व महाविर सदन"**.

२. भुकर पहाणी क्र.२२४०, भुलेश्वर विभाग, इ.क्र.६२-७० व इ.क्र.७०अे, सिताराम पोद्दार मार्ग, मुंबई येथील **"लक्ष्मी बिल्डिंग"**.

३. भूकर पहाणी क्र.१०३७, गिरगांव विभाग, इ.क्र.१६५, खेतवाडी बॅक रोड, गिरगांव,मुंबई-४ येथील **"मणीबाई भवन"**.

४. भुकर पहाणी क्र.४३२, गिरगाव विभाग, इ.क्र.१(७७-७९) आणि इ.क्र.२(८१-८१बी), खाडीलकर मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४ येथील **"गांधी निवास"**.

५. भूकर पहाणी क्र.१०३८, गिरगांव विभाग, इ.क्र.१५९, खेतवाडी बॅक रोड, गिरगांव,मुंबई-४ येथील **"जामे-ए-मंझिल"**.

६. भूकर पहाणी क्र.५८५, गिरगांव विभाग, इ.क्र.१७७ए-११७डी(ए-बी), १७७सी-डी (९), १७७ एफ (५-५बी) (ईएफ), १७७-जी(३-३जी), १७७-एच, १७७-जे व १७७-आय (२-२ए), वल्लभभाई पटेल रोड, (व्ही.पी.रोड) गिरगांव, मुंबई-४ येथील **"अमृतवाडी"**.

७. भूकर पहाणी क्र. २९,भायखळा विभाग, इ.क्र.५३-५३अेबी, ५५-५५एबी, ५७-५७ए, कामाठी पुरा, पहिली गल्ली आणि २४४-२४८-२५० बाप्टी रोड, कामाठीपुरा, मुंबई-०८ येथील **"कराचीवाला इमारत आणि शंकर मारवाडी चाळ"**.

RU

८. भुकर पहाणी क्र.३४ आणि ३५, भायखळा विभाग, इ.क्र.४९-४९अे-५१ मुंबई येथील **"इंद्रपाल इमारत (नगरदास चाळ)"**.

९. भूकर पहाणी क्र.११/११०४, भायखळा विभाग, प्लॉट क्र.१, स्कीम नं.४१, उंदारिया स्ट्रीट इस्टेट उपकर क्रमांक-ई३३४-३३५, इमारत क्र.४२-४८ उंदरिया स्ट्रीट,मुंबई ०८ येथील **"नरेश निवास"**.

१०. भुकर पहाणी क्र.४६०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५४-दादर माटुंगा विभाग, इ.क्र.१४४२-ए, भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९ मुंबई येथील **"रसीक व्हीला"**.

११. भुकर पहाणी क्र.७४०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५११-दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.३१ व ८, लेडी जहांगीर रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९ येथील **"कनक विहार"**.

१२. भूकर पहाणी क्र.१६०३, माहिम विभाग, अंतिम भूखंड क्र.१५०, टी.पी.एस.४ माहिम विभाग, इ.क्र.१७-बी, डी.एल.वैद्य रोड, दादर (पश्चिम) मुंबई-२८ येथील **"सीता निवास"**.

१३. भूकर पहाणी क्र. ४९/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.३५, लालबाग इस्टेट, इ.क्र.२३२-२३८, डॉ.एस.एस.राव रोड, परेल, मुंबई १२ येथील **"तेजुकाया"**.

१४. भूकर पहाणी क्र.४८/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.३४, लालबाग इस्टेट,इ.क्र.२२२-२३०, डॉ.एस.एस.राव रोड, परेल, मुंबई १२ येथील **"राम भवन"**.

१५. भुकर पहाणी क्र.२८७९, भुलेश्वर विभाग, इ.क्र.७२-७४, व्ही.पी.रोड, मुंबई ४०० ०४ येथील **"अन्नपुर्णा सदन"**.

१६. भूकर पहाणी क्र.४६,ताडदेव विभाग, इ.क्र.२,४,६,दोराबजी मिठाईवाला लेन, ग्रँट रोड येथील **"भरुचा बिल्डींग,धन दादीना हाऊस"**.

१७. भुकर पहाणी क्र.११०, माझगाव विभाग, इ.क्र.३५, ३५अे, ३५बी व ३५सी नेसबीट रोड, माझगांव, मुंबई ४०० ०१० येथील **"जरीवाला चाळ"**.

१८. भुकर पहाणी क्र.१५९९, भायखळा विभाग, इ.क्र.१३, निशानपाडा क्रॉसलेन, मुंबई येथील **"रोशन मंजिल"**.

१९. भुकर पहाणी क्र.९७६ भुलेश्वर विभाग, इ.क्र.३६-३८, पिकेट रोड, मुंबई येथील **"वखारीया हाऊस"**.

२०. भूकर पहाणी क्र.१/७१ लोअर परेल विभाग, इ.क्र.३२१-३२३, ३२५-३२५बी, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथील **"गजानन निवास"**.

**ठराव क्रमांक - १३९ / १२४१**

मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील २० मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावास नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली . २१०६

१. भुकर पहाणी क्र.३०३३ व ३०३४, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१०० व १०२ भंडारी स्ट्रिट, मुंबई येथील **"गोदावरी भवन व महाविर सदन"**.

२. भुकर पहाणी क्र.२२४०, भुलेश्वर विभाग, इ.क्र.६२-७० व इ.क्र.७०अे, सिताराम पोद्दार मार्ग, मुंबई येथील **"लक्ष्मी बिल्डिंग"**.

३. भूकर पहाणी क्र.१०३७, गिरगांव विभाग, इ.क्र.१६५, खेतवाडी बॅक रोड, गिरगांव,मुंबई-४ येथील **"मणीबाई भवन"**.

४. भुकर पहाणी क्र.४३२, गिरगाव विभाग, इ.क्र.१(७७-७९) आणि इ.क्र.२(८१-८१बी), खाडीलकर मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४ येथील **"गांधी निवास"**.

५. भूकर पहाणी क्र.१०३८, गिरगांव विभाग, इ.क्र.१५९, खेतवाडी बॅक रोड, गिरगांव,मुंबई-४ येथील **"जामे-ए-मंझिल"**.

६. भूकर पहाणी क्र.५८५, गिरगांव विभाग, इ.क्र.१७७ए-११७डी(ए-बी), १७७सी-डी (९), १७७ एफ (५-५बी) (ईएफ), १७७-जी(३-३जी), १७७-एच, १७७-जे व १७७-आय (२-२ए), वल्लभभाई पटेल रोड, (व्ही.पी.रोड) गिरगांव, मुंबई-४ येथील **"अमृतवाडी"**.

७. भूकर पहाणी क्र. २९,भायखळा विभाग, इ.क्र.५३-५३अेबी, ५५-५५एबी, ५७-५७ए, कामाठी पुरा, पहिली गल्ली आणि २४४-२४८-२५० बाप्टी रोड, कामाठीपुरा, मुंबई-०८ येथील **"कराचीवाला इमारत आणि शंकर मारवाडी चाळ"**.

८. भुकर पहाणी क्र.३४ आणि ३५, भायखळा विभाग, इ.क्र.४९-४९अे-५१ मुंबई येथील **"इंद्रपाल इमारत (नगरदास चाळ)"**.

९. भूकर पहाणी क्र.११/११०४, भायखळा विभाग, प्लॉट क्र.१, स्कीम नं.४१, उंदारिया स्ट्रीट इस्टेट उपकर क्रमांक-ई३३४-३३५, इमारत क्र.४२-४८ उंदरिया स्ट्रीट,मुंबई ०८ येथील **"नरेश निवास"**.

१०. भूकर पहाणी क्र.४६०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५४-दादर माटुंगा विभाग, इ.क्र.१४४२-ए, भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९ मुंबई येथील **"रसीक व्हीला"**.

११. भुकर पहाणी क्र.७४०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५११-दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.३१ व ८, लेडी जहांगीर रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९ येथील **"कनक विहार"**.

१२. भूकर पहाणी क्र.१६०३, माहिम विभाग, अंतिम भूखंड क्र.१५०, टी.पी.एस.४ माहिम विभाग, इ.क्र.१७-बी, डी.एल.वैद्य रोड, दादर (पश्चिम) मुंबई-२८ येथील **"सीता निवास"**.

१३. भूकर पहाणी क्र. ४९/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.३५, लालबाग इस्टेट, इ.क्र.२३२-२३८, डॉ.एस.एस.राव रोड, परेल, मुंबई १२ येथील **"तेजुकाया"**

१४. भूकर पहाणी क्र.४८/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.३४, लालबाग इस्टेट,इ.क्र.२२२-२३०, डॉ.एस.एस.राव रोड, परेल, मुंबई १२ येथील **"राम भवन"**.

१५. भुकर पहाणी क्र.२८७९, भुलेश्वर विभाग, इ.क्र.७२-७४, व्ही.पी.रोड, मुंबई ४०० ०४ येथील **"अन्नपुर्णा सदन"**.

१६. भूकर पहाणी क्र.४६,ताडदेव विभाग, इ.क्र.२,४,६,दोराबजी मिठाईवाला लेन, ग्रँट रोड येथील **"भरुचा बिल्डींग,धन दादीना हाऊस"**.

१७. भुकर पहाणी क्र.११०, माझगाव विभाग, इ.क्र.३५, ३५अे, ३५बी व ३५सी नेसबीट रोड, माझगांव, मुंबई ४०० ०१० येथील **"जरीवाला चाळ"**.

१८. भुकर पहाणी क्र.१५९९, भायखळा विभाग, इ.क्र.१३, निशानपाडा क्रॉसलेन, मुंबई येथील **"रोशन मंजिल"**.

१९. भुकर पहाणी क्र.९७६ भुलेश्वर विभाग, इ.क्र.३६-३८, पिकेट रोड, मुंबई येथील **"वखारीया हाऊस"**.

२०. भूकर पहाणी क्र.१/७१ लोअर परेल विभाग, इ.क्र.३२१-३२३, ३२५-३२५बी, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथील **"गजानन निवास"**.

------------------oo-------------------------

मा.सभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय घेण्याचे ठरले

**बाब क्रमांक -१४०.२ (५)**

विषय - उपकर प्राप्त इमारतींच्या **दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी** प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------

**परिमंडळ-१** मधील (अे, सी-१, सी-२ व सी-३) ७३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **२०१ ते २१९** वर सादर करण्यांत आले आहेत. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४०/ १२४२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ७३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२५,७९,९५,४५१ /-(रुपये- पंचवीस कोटी एकोणऐंशी लक्ष पंच्याण्णऊ हजार चारशे एक्कावन्न फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १६,१५,८७,३३८/- (रुपये सोळा कोटी पंधरा लक्ष सत्याऐंशी हजार तिनशे अडतीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

---------------------oo--------------------

**बाब क्रमांक -१४०.२ (६)**

**विषय - परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-३, व ग-द) ०८ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **२२१ ते २२९** वर सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४०/ १२४३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०८ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,४४,२०,१०४ /-(रुपये- एक कोटी चव्वेचाळीस लक्ष विस हजार एकशे चार फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ८१,३४,१२१- (रुपये एक्याऐंशी लक्ष चवतीस हजार एकशे एकविस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक -१४०.२ (७)**

**विषय- परिमंडळ-३** मधील ( ई-१ व ई-२) ०३ इमारती.

----------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **२३१ ते २३७** वर सादर करण्यांत आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४०/१२४३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.६२,६४,६९१ /-(रुपये- बासष्ट लक्ष चौसष्ट हजार सहाशे एक्यांनऊ फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३८,१८,७६६/- (रुपये अड्तीस लक्ष अठरा हजार सातशे सहासष्ट फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------------

**बाब क्रमांक -१४०.८**

**विषय- १३९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील विषयाबाबत कार्यपालन अहवाल**

**१३० व्या बैठकीच्या** कार्यवृत्तांतातील विषयाबाबत कार्यपालन अहवाल पृ.क्र. **२३९ ते २४३** वर मंडळास माहितीकरिता सादर करण्यांत आला आहे.

----------o-----o-----------

<u>बाब क्रमांक -१४०.२ (८)</u>

**विषय- डी-२ विभागाअंतर्गत इमारत क्रमांक १६०-१६० अे, अलीभाई प्रेमजी मार्ग, मुंबई दुरुस्ती दर रु.२०००/ चौ.मी.लागू करण्याबाबत.**

----------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २४४ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक - १४०/१२४४</u>

सविस्तर चर्चेअंती डी-२ विभागाअंतर्गत इमारत क्रमांक-१६०-१६० अे, अलीभाई प्रेमजी मार्ग,मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा रु. १,१५,५१२/- या अधिकच्या खर्चास रु. २०००/- प्र.चौ,मि, मर्यादेच्या अधिन राहून सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.-

**सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता**
**मुं.इ.दु.व पु.मंडळ.**

१२/७/९९

**मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,**
**मुं.इ. दु.व पु.मंडळ**

१२/७/९९

**बाब क्रमांक -१४०.२ (८)**

**विषय- डी-२ विभागाअंतर्गत इमारत क्रमांक १६०-१६० अे, अलीभाई प्रेमजी मार्ग, मुंबई दुरुस्ती दर रु.२०००/ चौ.मी.लागू करण्याबाबत.**

----------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २४४ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४०/१२४४**

सविस्तर चर्चेअंती डी-२ विभागाअंतर्गत इमारत क्रमांक-१६०-१६० अे, अलीभाई प्रेमजी मार्ग,मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा रु. १,१५,५१२/- या अधिकच्या खर्चास रु. २०००/- प्र.चौ,मि, मर्यादेच्या अधिन राहून सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.-

स्वाक्षांकित/-
**मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,**
**मुं.इ. दु.व पु.मंडळ**

**सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता**
**मुं.इ.दु.व पु.मंडळ.**